पोलीस ठाणे टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना
सत्यमेव जयते

N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** टेंबुर्णी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0237 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/11/2024 22:39

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 09/11/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 09/11/2024
**Time From (वेळेपासून):** 13:35 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:35 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 09/11/2024 **Time (वेळ):** 22:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 014
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 09/11/2024 22:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 8 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** गाडेगव्हाण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with CamScanner

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दिनेश सखाराम खरात
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1992
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अकोला देव,टेंबुर्णी ,जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अकोला देव,टेंबुर्णी ,जालना,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-8806153882

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | समाधान धोंडीबा लोखंडे | | | 1. आंबेगाव ,टेंबुर्णी ,जालना, महाराष्ट्र,भारत |
| 2 | कौसर नसीर शेख | | | 1. दहेगाव ,टेंबुर्णी ,जालना,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1,000/ रुपये लाचेची रक्कम | 1,000.00 |



Scanned with CamScanner

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | न्थ्रासिन पावडर लागलेली | |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

1,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

दिनांक 09.11.2024.
फिर्याद
मी दिनेश सखाराम खरात वय 32 वर्ष व्यवसाय शेती रा.अकोला देव ता.जाफ्राबाद जि.जालना मोबाईल नंबर 8806153882/ 7218365700 ईमेल आयडी-dinesh8806153882@gmail.com.
समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी दिनांक 09.11.2024 रोजी टेंभुर्णी ते राजुर रोडवर अकोला देव शिवारात हजर राहुन तक्रार दिली होती की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो. मला एकुण चार बहिणी असुन त्या चौघींचे पण लग्न झालेले असुन त्यांची नावे 1. ताराबाई भिमराव गायकवाड 2.रंजना पाडव 3.सुनिता दाभाडे व 4.अनिता घोरपडे अश्या आहे. त्यापैकी माझी बहिण ताराबाई गायकवाड हिच्या नावावर मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये 5 एक्कर जमिन आहे. माझी बहिण ताराबाई गायकवाड ही सध्या मुंबई येथे राहत असल्याने तिच्या जमिनी संबंधी सर्व व्यवहार मीच पाहतो.
मी माहे जुन 2023 मध्ये महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी कडुन महा कृषी ऊर्जा अभियान अंतर्गत प्रधानमंत्री कुसुम योजना मध्ये मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये 5 HP सोलार पंपसाठी बहिण ताराबाई गायकवाड हिच्या नावे ऑनलाईन अर्ज केला होता. सदर अर्जाचा नंबर MS1402267878 असा आहे. त्यानंतर सदरचा अर्ज उपविभागीय कार्यालय महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी मर्या. जाफ्राबाद यांनी मंजुर केल्या नंतर मी दिनांक 06.09.2024 रोजी लाभार्थी यांच्या हिश्याचे 16038/-रुपये ऑनलाईन भरुन इकोझन सोल्युशन प्रा. लि. कंपनीची निवड केली. त्यानंतर सदरचा अर्ज हा सर्व्हे करण्यासाठी मौजे गाढे गव्हाण गावाचे लाईनमन यांच्या लॉगिनला गेला होता.
मी दिनांक 08.11.2024 रोजी अकोला देव येथे घरी असतांना दुपारी चार वाजेच्या सुमारास माझ्या मोबाईलवर इकोझन सोल्युशन प्रा. लि. कंपनीचे सोलार फिट करणारा समाधान लोखंडे याचा फोन आला की, मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये 5 HP सोलार पंपसाठी लाईनमन यांच्या लॉगिंन मधुन सर्व्हे करायचा असल्यास लाईनमन यांना 1000/-रुपये दयावे लागेल असे म्हणाला. तेंव्हा मी उदया दिनांक 09.11.2024 रोजी तुला येऊन भेटतो असे सांगितले.
मला सोलार फिट करणारा समाधान लोखंडे यांना लाच देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी कोणतीही वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांच्याशी माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना लाच दिली नाही तर तो मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये 5 HP सोलार पंपसाठी लाईनमन यांच्या लॉगिंन मधुन सर्व्हे करणार नाही. त्यामुळे मी दिनांक 08.11.2024 रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना यांना कॉल करुन तक्रार असले बाबत कळविले होते.
मी आज दिनांक 09.11.2024 रोजी सोलार फिट करणारा समाधान लोखंडे यांची भेट घेणार आहे. त्यावेळी सोलार फिट करणारा समाधान लोखंडे यांनी माझ्या कडे लाच मागितल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.बाळु जाधवर साहेब यांनी माझी व सोबत आणलेल्या दोन शासकिय पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. मी दिलेल्या तक्रारीवर मी, पंचानी व श्री.जाधवर साहेब यांनी सह्या केल्या.



Scanned with CamScanner

मी सोलार फिट करणारा समाधान लोखंडे यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय? तो माझ्या कडे लाच मागतो काय ? याची खात्री करण्यासाठी श्री.जाधवर साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.जाधवर साहेब यांचे वक्तव्य घेण्यात आले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु केल्या नंतर मी माझ्या मोबाईल वरुन समाधान लोखंडे यांना कॉल केला असता त्यांनी मला टेंभुर्णी येथे भेटण्यास बोलावले. त्यावरुन पुन्हा व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माइया शर्टाच्या आतुन गळयात अडकवण्यात आली. त्यानंतर मला व पंच क्र.1 विकास राठोड यांचे सोबत माझ्या कडील मोटार सायकलने समाधान लोखंडे याला भेटण्यासाठी टेंभुर्णी येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 राठोड असे आम्ही टेंभुर्णी येथे जावुन पुन्हा मी माझ्या मोबाईल वरुन समाधान लोखंडे यांना कॉल केला असता त्यांनी मला टेंभुर्णी येथील गुळवे यांच्या हॉटेल जवळ बोलावल्याने मी व पंच क्र.1 राठोड असे आम्ही सदर ठिकाणी गेलो. त्यानंतर थोडया वेळाने समाधान लोखंडे हा सदर ठिकाणी आला. त्यावेळी माझी व समाधान लोखंडे आपसात कामासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी मी समाधान लोखंडे यांना कही कमी नही होणार का असे म्हणालो असता समाधान लोखंडे यांनी पंच क्र.1 राठोड यांचे समक्ष हजार एक रुपये देवुन टाका त्याला असे म्हणाले असता मी किती हजार का असे म्हणालो असता समाधान लोखंडे हाव असे म्हणाला. त्यानंतर पुन्हा माझी व सभाधान लोखंडे आपसात कामासंबंधी चर्चा झाली. चर्चे दरम्यान सर्व्हे करण्यासाठी शेतात आल्या नंतर लाचेची रक्कम देण्याचे आमचे आपसात ठरले. त्यावरुन मी व पंच क्र.1 राठोड असे आम्ही टेंभुर्णी ते राजुर रोडवर अकोला देव शिवारात सुरक्षित ठिकाणी परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.जाधवर साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.जाधवर साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये समाधान लोखंडे हा मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये 5 HP सोलार पंपसाठी लाईनमन यांच्या लॉगिन मधुन सर्व्हे करण्यासाठी लाईनमनला 1,000/-रुपये देऊन टाका असे म्हणुन लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम सर्व्हे करण्यासाठी आल्या नंतर शेतात स्विकारण्याचे मान्य केल्याचे लाच पडताळणी कारवाइ दरम्यान निष्पन्न झाले. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

त्यावरुन समाधान लोखंडे यांचे विरुध्द दिनांक 09.11.2024 रोजी मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.जाधवर साहेबांच्या सूचने वरुन सरकारी वाहनात पोलीस अंमलदार श्री.बिनोरकर यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. समाधान लोखंडे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 02 नोटा एकुण 1,000/- रुपये रक्कमेला अॅथ्रासीन पावडर लावली. सदरील अॅथ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. श्री.जाधवर साहेबांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन समाधान लोखंडे यांनी लाच स्विकारल्या नंतर खिश्यातील हात रुमाल डोक्याला बांधुन इशारा करणे बाबत मला सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सूचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार श्री.बिनोरकर यांना सापळा पथका मधुन वगळण्यात आले. समाधान लोखंडे हा मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये सर्व्हे करण्यासाठी येणार असल्याने मी, श्री.जाधवर साहेब, दोन्ही पंच व सापळा पथक असे आम्ही सर्वजन मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये जाऊन थांबलो. त्याबाबत तसा पंचनामा करण्यात आला.

त्यानंतर थोडया वेळाने समाधान लोखंडे यांचा माझ्या मोबाईलवर कॉल आला तेंव्हा त्याने आम्ही मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मध्ये येत असल्याबाबत कळविले. त्यानंतर श्री.जाधवर साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. मला व पंच क्र.1 राठोड यांना समाधान लोखंडे यांना भेटण्यासाठी मौजे गाढे गव्हाण शिवारात शेत गट नंबर 75 मधील विहरीवर थांबुन रा[illegible]यास सांगितले व श्री.जाधवर साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 यांचे सह शेत गट नंबर 75 च्या आजु बाजुला कपाशीच्या पिकात एकमेकांना दिसतील अशा रितीने सापळा लावून थांबले.

त्यानंतर थोडया वेळाने मी पुन्हा माझ्या मोबाईल वरुन समाधान लोखंडे यांना कॉल करुन कुठ पर्यंत आले असे विचारले असता त्याने आलो इथं असे सांगितले.त्यानंतर पुन्हा समाधान लोखंडे यांचा माझ्या मोबाईलवर कॉल आला व साबळे साहेबांच्या वावराच्या रस्त्यानं का असे विचारले असता मी त्यांना हो असे सांगितले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 राठोड थांबलेल्या ठिकाणी समाधान लोखंडे व एक अनोळखी इसम हे मोटार सायकलने आले. त्यानंतर आम्ही सर्वजन बोलत बोलत विहरी जवळ गेलो. विहरी जवळ गेल्या नंतर माझी व समाधान लोखंडे



Scanned with CamScanner

यांची आपसात कामा संबंधी चर्चा झाली. त्यावेळी चर्चे दरम्यान मी समाधान लोखंडे यांना मगरे सर हे का असे विचारले असता त्याने नाही शेख सर आहे असे सांगितले. त्यानंतर त्या दोघांनी सोलार पंपचा सर्व्हे करुन मोबाईलवर माझी सही घेतली. त्यानंतर थोडया वेळाने मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यातुन ॲन्थ्रासिन पावडर लावलेले 1,000/- रुपये काढुन समाधान लोखंडे हयांचे समोर धरुन घेऊन टाका असे म्हणालो असता समाधान लोखंडे याने हाताने शेख यांच्या कडे ईशारा करुन देऊन टाका त्यांना असे सांगितले. त्यावेळी मी ॲन्थ्रासिन पावडर लावलेले 1,000/- रुपये शेख हयांचे समोर धरुन हजार हे सर आ असे म्हणालो असता शेख यांनी त्यांच्या डाव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवुन पाचिकशे देयायचे असते गुरु असे म्हणाले. त्यानंतर थोडया वेळाने मी ठरल्या प्रमाणे लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला. ती वेळ दुपारी अंदाजे दीड ते पावणे दोन वाजेची होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्र.2 जाधव यांचे सह त्या ठिकाणी आले. श्री.जाधवर साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.जाधवर साहेबांनी पंच क्र.1 राठोड यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 राठोड यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमा कडे अंगुली निर्देश करुन हेच समाधान लोखंडे असुन हयांनी तक्रारदार यांना बाजुला उभ्या असलेल्या शेख नावाच्या इसमा कडे देण्यास सांगितल्याने शेख याने तक्रारदार यांच्या कडुन डाव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या पॅन्टच्या पाठीमागील डाव्या बाजुच्या खिश्यात ठेवले आहे असे सांगितल्याने समाधान लोखंडे व शेख यांना पंचा समक्ष लाचेच्या रक्कमेसह जागेवर पकडले. त्यानंतर श्री.जाधवर साहेबांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर समाधान लोखंडे व शेख यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे अनुक्रमे नाव समाधान धोंडीबा लोखंडे वय 30 वर्षे व्यवसाय खाजगी नोकरी फिटर इकोझन सोल्युशन प्रा. लिमिटेड कंपनी पुणे रा.आंबेगाव ता.जाफ्राबाद जि.जालना व कौसर नसीर शेख वय 30 वर्ष व्यवसाय मजुरी रा.दहेगाव ता.जाफ्राबाद जि.जालना असे सांगीतले. कौसर नसीर शेख यांना स्विकारलेली रक्कम कोठे ठेवली असे विचारले असता त्यांनी त्यांचे पॅन्टच्या पाठीमागील डाव्या खिश्यात ठेवल्याचे सांगितल्याने पंच क्र.2 जाधव यांनी पॅन्टच्या पाठीमागील डाव्या खिश्यामधुन लाचेचे 1,000/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटाचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर कौसर शेख यास सरकारी वाहनात बसवुन वाहनाच्या काचा बंद करुन काळ्या कपडयाच्या सहायाने अंधार करुन श्री.जाधवर साहेबांनी अल्ट्राव्हायलेट बॅटरीच्या सहायाने कौसर शेख याचे हात, पॅन्ट व लाचेच्या नोटा चेक केल्या असता कौसर शेख यांचे डाव्या हाताचे बोटावर, पॅन्टच्या पाठीमागील डाव्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली.टिप-सीसीटीएनएस प्रणाली मध्ये शब्द संख्या अपुरी पडत आसल्याने पुढील फिर्याद सोबत जोडत आहोत.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Sachin Vitthal Khamgal(I (Inspector)) / API **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे टेंभूर्णी
ता जाफ्राबाद जि जालना

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Sachin Vitthal Kham
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): API



Scanned with CamScanner